६५

**RNI No. MAHBIL/2009/31733**
**Reg. No. MH/MR/South-322/2010-12**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ४, अंक ३९(२)] बुधवार, जुलै १८, २०१२/आषाढ २७, शके १९३४ [पृष्ठे ३
किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक १०१

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

मंत्रालय, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ जुलै २०१२

### अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक आपना. २०१०/प्र.क्र. ३७५/पापु-१५.---भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि सध्या अस्तित्वात असलेले यासंबंधीचे सर्व नियम, आदेश व अनुदेश निष्प्रभावी करून, महाराष्ट्राचे राज्यपाल हे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांच्या अधिनस्त संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे, मधील ' वरिष्ठ रसायनी ' गट अ या पदावरील नेमणुकीचे पुढीलप्रमाणे नियम तयार करीत आहेत :---

१. या नियमांना, ' वरिष्ठ रसायनी गट-अ (सेवा प्रवेश) नियम २०१२ ' असे संबोधण्यात यावे.

२. या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,---

(अ) '' विभाग '' म्हणजे शासनाचा पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ;

(ब) '' संचालनालय '' म्हणजे शासनाचे संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ;

(क) '' शासन '' म्हणजे महाराष्ट्र शासन.

३. संचालनालयातील 'वरिष्ठ रसायनी' गट अ या पदावर करावयाची नेमणूक सहायक रसायनी गट-ब या पदावर ३ वर्षांपेक्षा कमी नाही, अशी नियमित सेवा करीत असलेल्या योग्य त्या व्यक्तीमधून जेष्ठतेच्या आधारे पदोन्नतीने करता येईल.

४. ज्या उमेदवाराची नियुक्ती या पदाकरिता झालेली असेल, त्याला नियमाप्रमाणे मराठी व हिंदी भाषा परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागेल. मात्र, जी व्यक्ती यापूर्वीच हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण झाली असेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली असेल तर ती व्यक्ती त्यास अपवाद राहील.

५. या पदावर नियुक्त उमेदवाराने संचालनालय, माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य यांनी वेळोवेळी विहित केलेले संगणक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मालिनी वि. शंकर**

शासनाचे प्रधान सचिव.

## WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 7th July 2012

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. APANA. 2010/C.R. -375/WS-15.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, and in supersession of all existing rules, orders and instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, regulating recruitment to the posts of 'Senior Chemist' Group-A, in the Directorate of Groundwater Surveys and Development Agency, Pune, under the Water Supply and Sanitation Department, Government of Maharashtra namely :—

1. These rules may be called the 'Senior Chemist' Group-A (Recruitment), Rules, 2012.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) " Department " means the Water Supply and Sanitation Department of the Government ;

(*b*) " Directorate " means the Directorate of Groundwater Surveys and Development Agency of the Government ;

(*c*) " Government " means the Government of Maharashtra ;

3. Appointment to the post of 'Senior Chemist Group-A' in the Directorate, shall be made by Promotion of suitable person on the basis of seniortiy, subject to fitness, from amongst the persons holding the post of Assistant Chemist Group-B having not less than 3 years regular service in that post.

4. A person appointed to the post shall be required to pass examinations in Marathi and Hindi according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing those examinations.

5. A person appointed to the post shall possess a certificate in computer operation, as prescribed by the Directorate of Information Technology. of the Government from time to time.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MALINI V. SHANKAR,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004., EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.